# प्रेमानंद बी सहकारी गृहरचना संस्था (मर्यादित)

पीएनए/पीएनए(२)/एचएसजी/(टिसी)/२५९४१/२०२३-२४ दिनांक ३१/०७/२०२३
अंतिम भुखंड क्रमांक ९९२ सब प्लॉट ३० भाग, राजेंद्र नगर, नवी पेठ, पुणे ४११०३०.

## ठराव

प्रेमानंद 'बी' सहकारी गृहरचना संस्था (म.) चे पुर्नविकास प्रकल्प उभारणीकरिता मे. गंगोत्री होम्स यांनी स्टेट बँक इंडिया या राष्ट्रीयकृत बँकेकडून कर्ज घेणेकरिता संस्थेला दि. १३-९-२०२४ रोजी मागणी अर्ज केला होता.

**विषय क्र. २** : संस्थेच्या पुर्नविकास प्रकल्पाकरिता नेमलेल्या विकसक मे. गंगोत्री होम्स यांना सदरील प्रकल्प उभा करण्याकरिता कर्जाची आवश्यकता आहे. तथापि विकसकांना विक्रीसाठी असलेल्या सदनिका व त्याची तुलनात्मक प्रमाणात (Proportionate) संस्थेची जागा गहाण (मार्गेज) ठेवण्यासंदर्भात चर्चा करुन निर्णय घेणे.

वरील विषयाबाबत दि. २४-११-२०२४ रोजी विशेष सर्वसाधारण सभा बोलविण्यात आली होती. या सभेमध्ये खालील अटी व शर्तींचे अधिन राहून कर्ज देणेबाबत सखोल चर्चा करण्यात आली.

**ठराव क्र. २ :** १. मे. गंगोत्री होम्स यांनी संस्थेचे प्रकल्प उभारणीकरिता सुंदरम फायनान्सकडून घेण्यात आलेले कर्ज तातडीने त्यांच्या फंडातून फेडण्यात यावे तद्नंतरच स्टेट बँकेकडून कर्ज घेण्यात यावे. प्रेमानंद 'बी' चा पुर्नविकास करण्यासाठी स्वतंत्र कर्ज घेऊन व त्या कर्जासाठी स्वतंत्र परतफेडीचे वेळापत्रक तयार करुन प्रेमानंद 'बी' च्या तारणावर घेतलेले कर्ज हे प्रेमानंद 'बी' च्या पुर्नविकासासाठी वापरले जाईल व ते कर्ज किंवा त्यातील कुठलीही रक्कम मे. गंगोत्री होम्स यांच्या अन्या कोणत्याही प्रकल्पासाठी वापरली जाणार नाही. अशा बँकेस सूचना देणारे पत्र बँकेस देऊन बँकेने ते स्विकारल्याची पोहोच प्रेमानंद 'बी' सोसायटी यांना देऊन नंतरच कर्ज रक्कम वापरण्यासाठी दिली जाईल.

स्वतंत्र मार्गेज : प्रेमानंद 'बी' सदरप्रमाणे ठरलेल्या कर्जाची अंदाजे रक्कम रुपये २० कोटीपेक्षा जास्त रहाणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.



Scanned with ACE Scanner

२. स्टेट बँक ऑफ इंडिया या राष्ट्रीयकृत बँकेकडून कर्ज घेताना विकसन करारनाम्यामध्ये फक्त गहाण ठेवण्याच्या अटीमध्ये बदल करण्यात यावा, इतर कोणताही बदल करण्यात येवू नये. तसेच पुरवणी विकसन करार कर्ज मिळण्यापूर्वी करणे बंधनकारक राहील.

३. स्टेट बँक ऑफ इंडिया या राष्ट्रीयकृत बँकेकडून कर्ज घेताना डिसबसमेंट रिपोर्ट, प्रोग्रेस रिपोर्ट, इत्यादी सोसायटीला देणे बंधनकारक राहतील.

४. स्टेट बँक ऑफ इंडिया या राष्ट्रीकृत बँकेकडून कर्ज घेण्यापूर्वी हमीपत्र संस्थेस देण्यात यावी व त्यासोबत बांधकामाचे टप्पे कसे पुर्ण करणार आहात याबाबतचे वेळापत्रकही देण्यात यावे.

५. स्टेट बँक ऑफ इंडिया यांनी कर्ज देताना बँकेचे नियमानुसार (बांधकामाच्या टप्प्याच्या प्रगतीनुसार) देण्याची दक्षता घेण्यात यावी. बांधकाम साहित्य पुरवठा करणाऱ्यांना आपल्या बँकेचे नियमानुसार रक्कम अदा करण्यात यावे.

६. स्टेट बँक ऑफ इंडिया यांनी कर्जाची रक्कम मे. गंगोत्री होम्स यांच्या खात्यात जमा करण्यात येऊ नये याबाबत दक्षता घ्यावी.

७. स्टेट बँक ऑफ इंडिया राष्ट्रीयकृत बँकेकडून घेतलेले कर्ज दुसऱ्या बँकेकडे कर्ज वर्ग करता येणार नाही.

८. मे. गंगोत्री होम्स यांनी वेळेत स्टेट बँक ऑफ इंडियाचे घेतलेले कर्ज परतफेड करण्याची दक्षता घ्यावी.

९. स्टेट बँक ऑफ इंडिया या राष्ट्रीयकृत बँकेचे अधिकाऱ्यांनी मे. गंगोत्री होम्स हे काही कारणास्तव आर्थिक अडचणी आल्यास त्यांनी संस्थेला वेळेत कळविणे बंधनकारक राहिल, याबाबत सर्वस्वी जबाबदारी बँकेची राहील.



Scanned with ACE Scanner

# प्रेमानंद बी सहकारी गृहरचना संस्था (मर्यादित)

पीएनए/पीएनए(२)/एचएसजी/(टिसी)/२५९४१/२०२३-२४ दिनांक ३१/०७/२०२३
अंतिम भुखंड क्रमांक ९९२ सब प्लॉट ३० भाग, राजेंद्र नगर, नवी पेठ, पुणे ४११०३०.

१०. प्रेमानंद 'बी' सहकारी गृहरचना संस्था मर्यादित यांचे प्रकल्प उभारण्याकरिता घेतलेले कर्जाचा कालावधी कंप्लीशन सर्टिफिकेट / भोगवटापत्र / ॲक्युपेशन सर्टिफिकेट मिळाल्यानंतर ३० दिवसाच्या आत घेतलेले पुर्ण कर्ज परतफेड करणे आवश्यक आहे.

११. मे. गंगोत्री होम्स यांनी कर्ज घेतल्यानंतर सभासदांच्या सदनिकेवर कुठल्याही प्रकारची तोशिष लागणार नाही याची दक्षता घ्यावी.

१२. वरील अटी व शर्तीची पुर्तता मे. गंगोत्री होम्स यांनी कटाक्षाने पालन करणे बंधनकारक राहील.

सदर सभेत उपस्थित असलेल्या सर्व सभासदांनी विकसक मे. गंगोत्री होम्स यांना प्रेमानंद 'बी' सहकारी गृहरचना संस्था मर्यादित यांची मालकीची जमिन पुर्णपणे गहान ठेवून राष्ट्रीयकृत बँक, स्टेट बँक ऑफ इंडियाकडूनच कर्ज घेण्यासाठी संस्थेचे प्रकल्प उभारणीकरीता सर्व सभासद यांनी आपले वैयक्तिक मत कॅमेरा समोर नोंदवून सर्वांनी एकमताने मंजुरी देण्याचे ठरले.

**ठराव एकमताने मान्य**

**सूचक : श्री. संदिप इनामदार** **अनुमोदक : श्री. महेश कोंडे**

प्रेमानंद बी सहकारी गृहरचना संस्था मर्या.

अध्यक्ष सचिव खजिनदार



Scanned with ACE Scanner